# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

### ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना''

शासनाने ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना'' आणि शासनाच्या अखत्यारितील शिष्यवृत्तीच्या इतर योजनांसाठी पात्र असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत. याबाबत विद्यापीठाने परिपत्रक दि. १४/०७/२०१८, १०/०९/२०१८, दि. १४/०९/२०१८ व दि. ०४/१०/२०१८ अन्वये सर्व संबधिताना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत.

वरील शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी तसेच जे विद्यार्थी वरील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत मात्र, त्यांच्याकडून १०० टक्के शिक्षण शुल्क आकारण्यात आलेले असेल अशा विद्यार्थ्यांना शासनाने दिलेल्या आदेशानुसार ५० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम परत करण्याबाबत वारंवार संबंधित विभागास सूचना दिलेल्या आहेत. तथापी, अद्यापही याबाबत कार्यवाही होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत.

तरी, शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये विद्यापीठ विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, वरील योजनांसाठी पात्र असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी पुर्ण शुल्क भरलेले असेल मात्र त्यांनी अद्यापही ५० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम परत करण्यासंदर्भात अर्ज केलेले नसेल अशा विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्काची रक्कम परत मिळण्याबाबतचा अर्ज आपल्या विभागामार्फत खालील कागदपत्रासह या कार्यालयास त्वरीत सादर करावेत.

- विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र
- शुल्क भरल्याचे चलन
- तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला
- बँक पासबुकची झेरॉक्स

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४१०३ }
दिनांक : ०८/१०/२०१८ }

प्रत:

मा. विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

प्रत : माहितीसाठी

सहा. कुलसचिव, मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

कार्यकारी सहायक, मा. कुलसचिव यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे